Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi / English

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार<br>**प्रा. बी. आय. परदेशी** | १-३ |
| २ | सामाजिक व शैक्षणिक सुधारणांच्या विशेष संदर्भात<br>**प्रा. डॉ. धनंजय रमाकांत चौधरी** | ४-८ |
| ३ | शाहू महाराज "आदर्श राजा व आदर्श व्यक्तिमत्व"<br>**Prof. Dilip Harsing Rathod** | ९-११ |
| ४ | सामाजिक सुधारणांच्या बचनबद्धतेमध्ये सामाजिकीकरण आणि समाजभिमुख वर्तनशैलीची भुमिका<br>**डॉ. गणेश लोखंडे**<br>**प्रा. संगिता जगताप** | १२-१७ |
| ५ | शाहू महाराजांचा शेती सुधारणा धोरणाचा चिकित्सात्मक अभ्यास<br>**डॉ. गोडसे बी. पी.** | १८-२० |
| ६ | राजर्षी शाहूंच्या शिक्षणविषयक योगदानांचा मागोवा<br>**डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक** | २१-२५ |
| ७ | छत्रपती राजर्षी शाहू अतऐव कोल्हापूर संस्थानचा शैक्षणिक बोजवारा<br>**प्रा. डॉ. खासेराव भैरव सिंदे पाटील** | २६-३१ |
| ८ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज : वर्तमान व मानवतावाद<br>**प्रा. डॉ. मोहन राजाराम निंबाळकर** | ३२-३५ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक आणि शेती विषयक धोरण<br>**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर** | ३६-३९ |
| १० | सामाजिक समतेचे अध्वर्यू - राजर्षी शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. दिलीपसिंग निकुंभ** | ४०-४६ |
| ११ | राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री सुधारणावादी कायदे<br>**सहा. प्रा. विजय पंडित सुर्यवंशी** | ४७-५० |
| १२ | राजर्षी शाहू महाराज एक सामाजिक सुधारक<br>**प्रा. एम. जी. वसावे** | ५१-५४ |




Scanned with OKEN Scanner

18-19

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ९. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक आणि शेती विषयक धोरण

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
इतिहास विभाग, राणीलक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

**प्रस्तावना**

१९ व्या शतकातील समाज पुर्णपणे अनिष्ट रूढी - परंपराच्या विळख्यात जखडला गेला होता. समाज रचना प्राचीन काळापासुन चार्तुवर्ण्य पध्दतीवर आधारलेली आहे. आपल्या संस्कृतीच्या रूढीपरंपरा एका पिढीकडुन दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करणे हे येथील जनता जीवनाचे ध्येय मानतात समाज जीवनावर चार्तुवर्ण्य व्यवस्थेचा जबरदस्त पगडा होता. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावर ब्रिटीश काळात संघटनात्मक आणि संस्थात्मक कार्याने या काळात उत्साह निर्माण झाला. राजकारण, समाजकारण आणि शिक्षण या क्षेत्रात स्वतःला पुर्णपणे झोकुन देऊन निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक प्रभावी फळी निर्माण झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन मानले गेले. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, कर्वे, राजर्षी शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे.

**सामाजिक धोरण आणि सुधारणा**

राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या सत्तेचा आणि राजपदाचा उपयोग समाजविकासासाठी केला. त्यांनी आपल्या संस्थानात महत्वपुर्ण बदल करून समाज विकासाला एक विधायक दिशा प्राप्त करून दिली. राजर्षी शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थानाची सुत्रे हाती घेण्या अगोदर राजकोट येथील राजकुमार महाविद्यालयातुन पदवीचे शिक्षण घेतले होते. त्यांनी मुळातचं पाश्चात्य धरतीचे शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्या विचारांच्या कक्षा रूंदावल्या होत्या. समाजाविषयी व्यापक दृष्टीकोन निर्माण झालेला होता. इंग्रजी आमदानीत ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी आलेल्या मिशनरींचे, त्यांच्या कार्याचे महत्व तत्कालीन सुशिक्षितांना पटले. परोपकार, दयाशीलता, या गोष्टी आपल्याकडे जरी असल्या तरी संघटितपणे व शिस्तबध्द रितीने सेवाकार्य करण्याची प्रेरणा पाश्चात्य शिक्षणातुन मिळाली. पाश्चात्य शिक्षणामुळे आणि त्यांच्या सहवासामुळे आपल्याकडे असलेल्या श्रेष्ठ गुणांची सुशिक्षीत वर्गाला जाणीव झाली. बुध्दिवाद, ऐहिकता, स्वातंत्र्य, समता यावर आधारित अशा पाश्चात्य शिक्षण व्यवस्थेमुळे वैचारिक जागृतीस फार मोठी चालना मिळाली. त्याच बरोबर युरोपीयन समाजाने केलेल्या प्रगतीची माहिती झाली. त्यातुनचं राजर्षी शाहु महाराजासारखे समाज सुधारक पुढे आले.

आर्थिक क्षेत्रात वतनदारी, सामाजिक क्षेत्रात विषमतेवर आधारलेली जातिव्यवस्था आणि या दोन्हीवर धर्मसंस्थेचे नियंत्रण हे समाज व्यवस्थेचे चित्र होते. सामाजिक विषमता, शोषण करणारा उच्च वर्ग अशी समाजाची भिषण स्थिती निर्माण झ



Self Attested